# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


**स्पीडपोस्ट/ई-मेलव्दारे**

क्रमांकः२/एनजीसी/डीटीई नॉमिनी/२०१५/ ५९२

दिनांक : 27 MAR 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर.

विषय : व्यावसायिक संस्थांमधील शिक्षकीय पदभरती निवडसमितीत संचालनालयाचे प्रतिनिधीबाबत.

संदर्भ : १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.२/एनजीसी/संप्र/२०१२/१७४७, दि.४.१०.२०१२

२. अध्यक्ष, बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, नागपुर यांचे पत्र दि.०७.०३.२०१५

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या कार्यालयीन आदेशान्वये आपल्या विभागातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांबाबतची शिक्षकीय पदांच्या मुलाखत निवड समितीमध्ये संचालक, तंत्रशिक्षण यांचे प्रतिनिधी म्हणुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

संदर्भ क्र. २ च्या पत्रानुसार संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी के.डी.के. अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपुर या त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या निवडसमितीस संचालनालयाचे प्रतिनिधी म्हणुन उपस्थित राहण्याबाबत विनंती केली आहे. सदर पत्र पुढील कार्यवाहीस्तव आपणाकडे पाठविण्यात येत आहे. सदर प्रकरणी उचित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 2258
दिनांक - 6 APR 2015

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सोबत :संदर्भाधीन पत्रे.

प्रत : अध्यक्ष, बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, राजविला खमला रोड, नागपुर ४४० ०२५ यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता.

\\DTENS1\Desk2\Datta\Desk2\2015\14 DTE Nominee shikshak Padbharati.docx

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk2@dte org.in Internet :http/www.dte.org.in

कार्यालयीन आदेश

क्र. २/एनजीसी/सं.प्र./२०१२/ १७७८
दिनांक : 4 OCT 2012

पहा : कार्यालयीन आदेश क्र. २/एनजीसी/र.सं.विषयतज्ञ/नियुक्ती/२००९/२८८, दि. १४.०५.२००९

उपरोक्त कार्यालयीन आदेशान्वये अशासकीय विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या मुलाखीस विषयतज्ञ व संचालकांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्याचे डॉ. व्ही. एम. मोहितकर, उपसंचालक यांना सोपविण्यात आलेल्या अधिकारात अंशतः बदल करुन या आदेशान्वये सूधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

संचालक, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई हे त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील आदेशापर्यंत या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या मुलाखत निवड समितीमध्ये संचालक, तंत्र शिक्षण यांचे प्रतिनिधी म्हणून सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्याच्या अधिपत्याखालील अशासकीय विनाअनुदानित तत्वावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेतील शिक्षकीय पदांच्या मुलाखतीसाठी स्वतः किंवा त्याचे प्रतिनिधी म्हणून शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थेतील प्राचार्य / प्राध्यापक दर्जाच्या अधिका-यास नियुक्त करण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. मा. कुलसचिव, राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर

त्यांना कळविण्यात येते की, सदर आदेश आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील अशासकीय विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावेत.